महाराष्ट्र शासन

धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,

मुंबई यांचे कार्यालय.

धर्मादाय आयुक्त भवन	Office of the CHARITY COMMISSIONER
सास्मिरा इमारत, दुसरा मजला, सास्मिरा मार्ग,	Sasmira Building, 2nd Floor,Sasmira Marg,
वरळी, मुंबई ४०००३०	Worli, Mumbai 400030.
दूरध्वनी क्रमांक :24935434, 24935490	Tel No : 24935434, 24935490
Website: www.charity.maharashtra.gov.in	E-mail ID: supdtest.mum-mh@gov.in

दरपत्रक शिपाई क्र.०१/२०२६ दि.

बाह्ययंत्रणमार्फत मनुष्यबळ (शिपाई) **पुरविणाऱ्या संस्थाकडून दरपत्रक मागविणेबाबत**

धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई (मुख्यालय) या कार्यालयात शिपाई पद शासन मान्यतेच्या दिनांकापासून अकारा महिन्याच्या कालावधीसाठी बाह्ययंत्रणेमार्फत भरण्यासाठी शिपाई पुरविण्याऱ्या स्थानिक नोंदणीकृत संस्थांकडून दि.०१.०८.२०२६ ते दि.१५.०८.२०२६ या कालावधीत दरपत्रक मागविण्यात येत आहे.

दरपत्रक सादर करणेसाठी सविस्तर तपशिल, बाह्ययंत्रणद्वारे मनुष्यबळ पुरविण्याऱ्या संस्थाकरिता तसेच आवश्यक अटी, शर्ती इ. विषयक तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

अ	**पक्षकार :-**
	करारनाम्याचे पक्षकार हे कंत्राटदार आणि (ज्यांना काम सोपविले आहे) धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे राहतील.

ब	**शिपाई उमेदवारांसाठी अटी व शर्ती**
१	दिनांक २.०८.२०२६ रोजी उमेदवाराचे वय किमान वय १८ वर्षे व कमाल ४५ असावे.
२	उमेदवारास मराठी, हिंदी भाषा वाचता व बोलता आणि इंग्रजी भाषा वाचता येणे आवश्यक आहे.
३	उमेदवार निर्व्यसनी असावा, गुन्हेगारी पार्श्वभुमीचा नसावा.
४	शिपाई यांची वैयक्तिक माहिती कंत्राटदारास पुरविणे आवश्यक राहिल, उदा. ओळखपत्र (आधारकार्ड, निवडणूक कार्ड, पॅन कार्ड इत्यादी पैकी एक), शैक्षणिक अर्हता, कायम व सध्याचा पत्ता, नमुना स्वाक्षरी, अलीकडे काढलेला पासपोर्ट साइज फोटोग्राफ व बँक खात्याचा तपशील.

क	**कंत्राटी शिपाई याची जबाबदारी**
१	कार्यालयात पूर्ण वेळ हजर रहावे लागेल.
२	कार्यालय चालू व बंद करण्याची जबाबदारी वरिष्ठांच्या दालनाबाहेर कार्यालयीन वेळेत बसून राहणे व कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी यांनी सांगितलेली कामे पार पाडावी लागतील.
३	वक्तशीरपणे व नियमितपणे कार्यालयातील कामे करावी लागतील.
४	शिपाई यांची वर्तणूक व कामाची गुणवत्ता उच्च दर्जाची राहील व त्यांचे उत्तरदायित्व हे कार्यालयाच्या हितसंबंधाची रक्षा करणेच राहील.
५	शिपाई यांचेकडून कार्यालयातील सरकारी मालमत्तेचे नुकसान झाले असे आढळून आल्यास त्यांना देय असलेल्या रकमेतून सदर रक्कम वसूल करण्यात येईल.
६	कार्यालयातील वरिष्ठाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या आदेशाचे पालन करावे लागेल.

ड	**शिपाई याना अनुज्ञेय असणारे पारिश्रमिक, भत्ते व त्यांचे प्रदान**
१	उक्त पदासाठी किमान वेतन अधिनियम १९४८ कायद्यानुसार वेतन देणे बंधनकारक राहील.
२	उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या सुधारीत अधिसूचना दि.२४.०७.२०१९ नुसार कंत्राटी किमान वेतनाचे दर सुधारित करण्यात आलेले आहेत. तसेच विविध कामगार कायद्यान्वये वेळोवेळी निश्चित कलेल्या दरानुसार विशेष/महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, इतर भत्ते व वजावटी उदा. भविष्य निर्वाह निधी/राज्य कामगार विमा योजना/व्यावसायिक कर/बोनस/कामगार कल्याण निधी या दायित्वांचा समावेश करुन एकूण किमान व वेतन व भत्ते परिगिणित करण्यात आलेले आहे. परिगणना तक्ता सोबत एक्सेलशीटव्दारे BOQ (Bill of Quantity) उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यानुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन व अनुषंगिक भत्ते प्रदान करणे तसेच नियमातील तरतूदीनुसार त्याबाबतचे दायित्वे संबंधित प्राधिकारणाकडे भरणे बंधनकारक राहील.
३	सदर दर ढोबळमानाने नमूद केलेले असून दरामध्ये बदल करण्याचे अधिकार शासनास आहेत. नोटीस जाहीर करताना दर ठरविण्यात आलेले असले तरी सदर दर शासनाकडून प्रमाणित करून घेतल्यानंतरच लागू करण्यात येते.
४	वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. जीएसटी-१०१७/प्र.क्र.८१/कराधान-१, दि. १९.०८.२०१७ नुसार जीएसटी अधिनियमानुसार कराची आकारणी बंधनकारक आहे. परिगणना तक्त्यामध्ये एक्सेलशीटव्दारे BOQ (Bill of Quantity) सेवा कराची विहित दरानुसार आकारणी करण्यात येईल

इ	**दरपत्रकासंबंधीच्या अटी व शर्ती :-**
	अ. तांत्रिक लिफाफा
१	संबंधित संस्था/अर्जदार ही खालीलपैकी एका कायद्यांतर्गत असावी. (नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडावी) • मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ • भागीदारी संस्था अधिनियम, १९३२ • सहकारी संस्था अधिनियम, १९६१ • कंपनी अधिनियम, १९५६
२.	उदयोग, उर्जा व कामगार विभाग. शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग III/ उदयोग -४, दिनांक ०१.१२.२०१६ मधील प्रकरण क्र. ३/अ.क्र.३.१ व प्रकरण क्र. ६/ परिशिष्ट ८ मधील तरतूदीनुसार निविदा/ दरपत्रक अर्जासोबत निविदा शुल्कनिविदा शुल्क रु.१००/व बयाना रक्कम रु.१०००/ धनाकर्ष (राष्ट्रीयकृत बँकेचा) धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे नावाने देण्यात यावा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना प्राप्त निविदा शुल्क/बयाना रक्कम योग्य लेखाशीर्षाखाली जमा करावे. फक्त रोजगार व स्वयंरोजगार विभाग, शासन निर्णय क्र. रोस्वरो २००२/प्र.क्र.२६७/रास्वरो-१, दिनांक १७.०८.२००२ मधील अ. क्र. ८ अनव्ये शासकीय किंवा निमशासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयांमध्ये सेवेचा पुरवठाकरीता निविदा/दरपत्रक भरताना निविदा शुल्क/बयाणा रक्कम भरण्याच्या अटीतून पंजीकृत बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थांना/लोकसेवा केंद्राना सुट देण्यात आली आहे. त्याअनुषंगे आवश्यक प्रमाणपत्र सोबत जोडण्यात यावे. याव्यतिरिक्त अन्य शासन निर्णयातील तरतुदीनुसार अनामत रक्कम भरण्यापासून सूट मिळण्याची अट या दरपत्रिकेस लागू होत नसल्याने त्याअंतर्गत मोडणाऱ्या संस्थाना अनामत रक्कम भरणे अनिवार्य असेल.
३	आयकर अधिनियमाप्रमाणे दरमहा अदा होणाऱ्या देयकामधून नियमानुसार आयकर वजा करण्यात येईल. यासाठी पॅनकार्डची छायांकित प्रत जोडण्यात यावी.
४	वस्तू व सेवा कर कायदा, २०१७ नुसार नोंदणीकृत असल्याचे प्रमाणपत्र व क्रमांक जोडण्यात यावे.
५	शिपाई यांच्या वेतनातून भविष्य निर्वाह निधी/राज्य कामगार विमा योजना (EPF/ESIC) अंतर्गत वर्गणी वजा करण्यात येत असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.
६	मागील-२ वर्षाच्या कालावधीत किमान २ शासकीय/निमशासकीय कार्यालयांना शिपाई किंवा अन्य कर्मचारी कंत्राटीतत्वावर पुरविल्याबाबत व त्यांचे काम समाधानकारक असल्याचे संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे.
७	संस्थेची वार्षिक उलाढल ही मागील दोन वर्षासाठी सरासरी दहा लाखांपेक्षा कमी नसावी. तसेच सनदी लेखापालांकडून प्रमाणित करण्यात आलेल्या मागील दोन वर्षाच्या ताळेबंदाच्या प्रती दरपत्रक अर्जासोबत जोडण्यात याव्यात.
८	संस्थेचे नांव काळया यादीत समाविष्ट नसल्याबाबतचे, संस्थेविरोधात पोलिस

	चौकशी/तपास/न्यायालयीन प्रकरणे चालू नसल्याचे हमीपत्र संस्थेच्या चालकांचे सहीनिशी जोडण्यांत यावे.
९	दि. २०.१२.२०२२ अन्वये सुधारित आकृतिबंध मंजूर करण्यात आला त्यामध्ये गट-ड शिपाई, पहारेकरी, सफाईगार ही पदे मृत घोषित करण्यात आली असून ती बाह्ययंत्रणेव्दारे घेण्यास मंजूरी देण्यात आली आहे. दि. ०९.०३.२०२३ नुसार धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयासाठी मंजूर संवर्गनिहाय/पदनिहाय/जिल्हानिहाय पदांची पुनर्रचना व स्थायी अस्थायी पदांचे वर्गीकरण करण्यात आलेले आहे.

ब	**व्यापारी लिफाफा**
१	कंत्राटी शिपाई साठी किमान वेतन अधिनियम १९४८ कायद्यानुसार वेतन देणे बंधनकारक राहील.
२	उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या सुधारित अधिसूचना दिनांक २४.०७.२०१९ नुसार व किमान वेतन अधिनियमातील तरतूदीनुसार द्यावयाच्या मासिक पारिश्रमिकाची परिगणना सोबत एक्सेलशीटव्दारे BOQ (Bill of Quantity) उपलब्ध करून देण्यांत येत आहे.
३.	कंत्राटदाराने / पुरवठादाराने / निविदाकाराने वरील किमान वेतनानुसार मासिक पारिश्रमिक दर अदा करावे.
४.	कंत्राटदार / पुरवठादाराचे मान्य दर हे कार्यारंभ आदेश दिल्याच्या तारखेपासून ११ महिन्यांसाठी लागू राहतील. दर कराराच्या कालावधीत कोणतीही दरवाढ मंजूर केली जाणार नाही.

ई.	**दरपत्रके छाननीबाबत**
१.	कंत्राटदाराने / पुरवठादाराने नमूद केलेले दर हे दरपत्रके उघडण्याच्या तारखेपासून ९० दिवसांच्या कालावधीपर्यंत वैध / विधीग्राह्य असतील.
२.	दरपत्रके शक्य झाल्यास विहित केलेल्या दिनांकास उघडण्यात येतील. तांत्रिक दरपत्रकामध्ये पात्र ठरलेल्या पुरवठादाराचेच लिफाफे उघडण्यात येतील
३.	तांत्रिक दरपत्रक उघडल्यानंतर दरासंबंधीचे लिफाफे उघडण्यास काही अडचणी आल्यास दरपत्रकाचा लिफाफा उघडला जाणार नाही. किमान ३ वैध दरपत्रके असतील तरच दराचा लिफाफा उघडण्यात येईल. त्यातून पात्र ठरलेल्या कंत्राटदाराचे / पुरवठादाराचे न्युनतम किमतीचे दर स्विकृत करण्यात येतील.
४.	प्राप्त झालेले दर हे बाजारातील प्रचलित दरापेक्षा अवास्तव वा जास्त असणार नाहीत.

५.	शासनाने ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीनुसार दरपत्रके छाननीबाबतचा अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार कंत्राट मूल्याप्रमाणे संबंधित समितीकडे किंवा धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे राखून ठेवण्यात येतील. सदर निर्णय कंत्राटदार / पुरवठादार यांना मान्य करणे बंधनकारक राहील.
६.	सेवा आकाराचा दर नमुद केल्यानंतर कंत्राटावरील वस्तु व सेवा आकार (नियमानुसार लागू असेल त्याप्रमाणे) धरून कंत्राटाची एकत्रित रक्कम तुलनात्मक तक्तासाठी ग्राहय् धरण्यांत येईल.

फ.	पात्र निविदाकाराने / पुरवठादाराने करावयाच्या कार्यवाहीबाबत :
१.	उद्योग, ऊर्जा व कागार विभाग, शासन निर्णय क्र. : भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग- iii/उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६ मधील प्रकरण क्र. ४/अ.क्र.४.६ मधील तरतुदीनुसार निविदा मान्य झालेल्या कंत्राटदारास / पुरवठादारास निकाल कळविल्यानंतर १५ दिवसांच्या आत सुरक्षा ठेव अनामत (Performance Security Deposit) रुपये १०,०००/- राष्ट्रीयककृत बँकेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे नावे द्यावा लागेल. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी प्राप्त सुरक्षा ठेव रकक्म योग्य लेखाशीर्षाखाली जमा करावे.
२.	पात्र कंत्राटदाराने / पुरवठादाराने कामाचे आदेश देण्यापूर्वी रुपये ५००/- चे मुद्रांक पेपर वर करारनामा करून देणे आवश्यक राहील.
३.	करारनामा केल्यानंतर कंत्राटदाराने दिलेल्या विहित मुदतीत आवश्यकतेप्रमाणे मनुष्यबळ पुरवठा न केल्यास विहित नियमानुसार विलंब आकार/ दंड आकारला जाईल. सदर दंडाची वसुली प्रशासकीय सेवा आकार किंवा सुरक्षा ठेव अनामत रकमेतून करण्यात येईल.
४.	कंत्राटदाराकडून / पुरवठादाराकडून करारनाम्यातील कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास कामाचे आदेश रद्द करण्यात येतील व त्याला कोणतीही रक्कम प्रदेय राहणार नाही. जमा केलेल्या सुरक्षा ठेव अनामत रक्कम जप्त केली जाईल.
५.	करारनाम्याच्या कालावधीत कोणतीही तक्रार प्राप्त न झाल्यास, करारनाम्याच्या कालावधी पुर्ण झाल्यानंतर अथवा करारनामा संपुष्टात आल्यानंतर सदर रक्कम मुक्त करण्यात येईल.
६.	धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता निविदाधारकास १ महिन्याची आगाऊ नोटीस देऊन करारनामा रद्द करण्याचा / संपुष्टात आणण्याचा अधिकार असेल.

ग.	मासिक पारिश्रमिक अदा करण्याबाबतची कार्यपध्दती :
१.	वरीलप्रमाणे मनुष्यबळ पुरवठा केल्यानंतर, धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून रुजू झाल्याबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून संबंधित उमेदवाराची उपस्थितीची हजेरीपटावर नोंद घेतील.
२.	धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी प्रत्येक महिन्याच्या कार्यालयीन कामकाजाच्या शेवटच्या दिवशी संबंधित उमेदवाराचे उपस्थिती प्रमाणपत्र कंत्राटदार / पुरवठादार यांचेकडे पाठविणे आवश्यक राहील.
३.	कंत्राटदाराने / पुरवठादाराने उपस्थिती प्रमाणपत्राच्या प्रतीसह महिन्याच्या ०५ तारखेपर्यंत देयक सादर करावे. देयक पारित झाल्यानंतर संबंधित कंत्राटदार / पुरवठादार यांना ई-प्रदान (NEFT/ECS/RTGS) करण्यात येईल. बाह्ययंत्रणेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या शिपाई यांना मासिक पारिश्रमिक त्यांच्या बँक खात्यामध्ये अदा केल्याचा पुरावा संबंधित संस्थेस धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई लेखा यांना प्रत्येक महिन्यात सादर करावा लागेल, त्यानंतरच पुढील महिन्याचे वेतन संस्थेस अदा करण्यात येईल.
४.	कंत्राटदारास देयक सादर करण्यास विलंब झाला तरी देखील मासिक पारिश्रमिक कंत्राटदाराने / पुरवठादाराने प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत संबंधित उमेदवाराच्या बँक खात्यावर रेखांकित धनादेशाव्दारे (Account Payee Cross Cheque)/ (NEFT/ECS/RTGS) व्दारे जमा करणे आवश्यक राहील.
५.	कंत्राटदाराने / पुरवठादाराने कंत्राटी शिपाई यांना दिलेल्या पारिश्रमिकाच्या / इतर भत्त्यांच्या प्रदानाबाबतची छायांकीत प्रत दर महा सादर केल्याशिवाय कंत्राटदाराला / पुरवठादाराला पुढील महिन्याचे देयक अदा केले जाणार नाही.
६.	कंत्राटदाराने / पुरवठादाराने कंत्राटी शिपाई यांना मासिक वेतनचिठ्ठी देणे आवश्यक राहील.
७.	कंत्राटदाराने / पुरवठादाराने कंत्राटी शिपाई याना किमान वेतन कायद्यातील तरतूदीपेक्षा कमी वेतन दिल्यास अथवा दायित्वाची रक्कम ठरलेल्या दराप्रमाणे कपात करून संबंधित प्राधिकरणाकडे जमा न केल्यास अथवा संबंधित उमेदवाराकडून ज्यादा रक्कम घेतल्याबाबतची तक्रार प्राप्त झाल्यास व तसे पुरावे आढळल्यास संबंधित कंत्राटदार / पुरवठादार किमान वेतन कायद्यातील तरतूदीप्रमाणे कारवाईस पात्र असेल.
८.	कंत्राटदारास / पुरवठादारास रक्कम अदा करताना आयकर व वस्तु व सेवाकर (GST) कायद्यातील तरतूदीनुसार आयकराची/वस्तु व सेवाकरची रक्कम कपात करुन उर्वरित रक्कम अदा केली जाईल. वस्तु व सेवा कर (GST) २०१७ व महाराष्ट्र वस्तू व सेवा कर कायद्याअंतर्गत

	अधिसूचना क्र. ५०/२०१८ मधील तरतूदीनुसार वस्तू व सेवा विषयक एका संविदाखालील मूल्य रु. २,५०,०००/- पेक्षा अधिक असेल अशा करपात्र वस्तू किंवा सेवा यांच्या पुरवठ्यासाठी प्रदान करण्यात येणाऱ्या रकमेतून विहित दरानुसार कपात करण्यास **धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई** यांना बंधनकारक राहील. तसेच याबाबत शासनाकडून वेळोवेळी लागू करण्यात आलेल्या नियमांप्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक राहील.
९.	व्यवसाय कर भरण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदार / पुरवठादार यांचे राहील.
१०.	उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१९/प्र.क्र.१३/ कामगार-८, दि. २२.०२.२०१९ नुसार कंत्राटी कर्मचाऱ्यास अदा करण्यासंबंधीच्या "जोडपत्र अ" मधील तरतूदी कंत्राटदारास / पुरवठादारास / निविदाकारास बंधनकारक राहील.
११.	**धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई** यांचेमार्फत कंत्राटदारास मासिक पारिश्रमिकाची अदायगी होणार असल्यामुळे दायित्व नियमातील तरतूदीनुसार जमा केले जात असल्याबाबतची खातरजमा त्यांचे स्तरावरून करणे आवश्यक राहील. करारनामा समाप्त झाल्यानंतर कंत्राटदारास सुरक्षा ठेव अनामत अदा करण्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र **धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई** यांचेकडे सादर केल्यानंतर अनामत रक्कम अदा करण्याबाबतचे आदेश प्रशा कोषा शाखेकडून निर्गमित करण्यात येतील.

घ	बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ (**शिपाई**) पुरविणाऱ्या संस्थांसाठी अटी व शर्ती
१.	शिपाई व उमेदवाराची कंत्राटी सेवा चालू ठेवण्याचे/ संपुष्टात आणण्याचे सर्व अधिकार **धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई** यांचे स्वाधीन राहतील.
२.	शिपाई याच्या वेळेवर कार्यालयात उपस्थित न झाल्यास किंवा विनापरवानगी गैरहजर राहिल्यास त्याचे त्या दिवसाचे वेतन अदा करण्यात येणार नाही.
३.	शिपाई रजेवर असल्यास पर्यायी शिपाई पुरविणे बंधनकारक राहील.
४.	उमेदवाराच्या सचोटी / चारित्र्याबाबतचे पोलीस खात्याचे प्रमाणपत्र हजर झाल्यावर सादर करावे लागेल.
५.	कायम स्वरूपी शासकीय नोकरीसाठी कार्यालयाकडे/शासनाकडे न्यायालयाकडे/ दावा अथवा खटला करणार नाही, अशा आशयाचे हमीपत्र सेवेत हजर होताना सादर करणे बंधनकारक.
६.	कोणतीही दरपत्रक स्विकारण्याचा किंवा एखादी/सर्वच दरपत्रक प्रक्रिया कारण न देता रद्द करण्याचा किंवा त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार मा.**धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई** याना राहिल.

वर नमूद अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या संस्थाकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

दि.३०.०७.२०२६ सांयकाळी ०५.०० वाजेपर्यंत या कार्यालयात स्वतः सादर करावीत किंवा वेळेत कार्यालयात मिळतील या प्रमाणे पोस्ट/कुरियर सेवेद्वारे पाठवातीत. दि.३०.०७.२०२६ दिनाका नंतर प्राप्त होणारी दरपत्रके दर प्रक्रियेसाठी विचारात घेतली जाणार नाही.

दि.३०.०७.२०२६ पर्यंत मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई (http://charity.maharashtra.gov.in.) या संकेतस्थळावर Tenders and Quotation या दुव्याखाली (tab) उपलब्ध राहिल.

ठिकाण : मुंबई
दिनाक – २३.०७.२०२६

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

तांत्रिक लिफाफा

१.	कंत्राटदाराचे संस्थेचे/कंपनीचे नाव व पूर्ण पत्ता	
	मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण परिक्षेत्रातील कार्यालयाचा तपशिलवार पत्ता	
२.	संस्था/कंपनी/फर्म असल्यास	
	नोंदणीचा तपशिल	
	अ) कंत्राटदाराचा/संस्थेचा/कंपनीचा संपूर्ण पत्ता	
३.	संपर्काचा तपशील	
	अ) दूरध्वनी क्रमांक	
	ब) भ्रमणध्वनी	
	क) ईमेल आयडी	
४.	दुकान परवाना क्रमांक/प्रमाणपत्र (नुतनीकरणासह)	
५.	EPF रजिस्ट्रेशन क्रमांक	
६.	ESIC रजिस्ट्रेशन क्रमांक	
७.	वस्तु व सेवा कर नोंदणी क्रमांक	
८.	व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र	
९.	शासकीय / निमशासकीय कार्यालयात कंत्राटी तत्वावर शिपाई याचा पुरवठा केला असल्याबाबत संबंधित विभागाने निर्गमित केलेले कोणतेही प्रमाणपत्र	
१०.	संस्थेचे/कंपनीचे/मालकाचे आयकर Pan Card क्रमांक (प्रत)	
११.	मागील ३ वर्षाचे Income Tax Return	
१२.	सनदी लेखापालाकडून प्रमाणित करण्यात आलेल्या मागील दोन वर्षाच्या ताळेबंदाच्या प्रती	
१३.	काळ्या यादीत न टाकल्याबाबत/बंदी न घातल्याबाबत प्रमाणपत्र	
१४.	अनुभव प्रमाणपत्र	

१. दरपत्रक मंजूर करण्याचे सर्व अधिकार खरेदी समितीकडे राखीव आहेत हे मला मान्य आहे.

२. या दरपत्रकातील अटी व शर्ती मला संपूर्णपणे मान्य आहेत. तसेच अटी व शर्तीबाबत माझी कोणतीही तक्रार नाही.

३. दरपत्रका समवेतच्या करारनाम्यातील सर्व बाबी मला विनाशर्त मान्य आहेत.

४. प्रमाणपत्रे सोबत जोडली आहेत.

दरपत्रकादाराची सही

रबर स्टँपसह

व्यापारी लिफाफा

अ.क्र.	बाब	दर		कुशल कामगारासाठी दर (प्रतिमाह) रुपया मध्ये
१	मूळ वेतन Basic Pay			१४,०९५
२	विशेष भत्ता (Special Allowance)			३,१३५
३	एकूण किमान वेतन		A	१७,२३०
i	(+) घरभाडे भत्ता @ ५% एकूण किमान वेतनावर	५%		८६२
ii	(+) बोनस उपदान @ ८.३३% एकूण किमान वेतनावर	८.३३%		१,४३५
iii	(+) रजा उपदान @ १.२८% एकूण किमान वेतनावर	१.२८%		२२१
४	एकूण किमान वेतन व भत्ते		B	१९,७४८
५	कर्मचाऱ्याच्या किमान वेतनातून वजा करावयाच्या कायदेशीर दायित्वाच्या बाबी			
i	भविष्य निर्वाह निधी @ १२% एकूण किमान वेतनावर	१२%		२,०६८
ii	प्रशासकीय दर भ.नि.नि. करीता @ १.१५% एकूण किमान वेतनावर	१.१५%		१९८
iii	राज्य कामगार विमा योजना @ ३.२५% एकूण किमान वेतन व भत्तेवर	३.२५%		५६०
iv	कामगार कल्याण निधी			
v	कायदेशीर दायित्वाच्या एकूण वजाती		C	२,८२६

६	एकूण किमान वेतन व भत्ते		D(B,C)	२२,५७४
७	सेवा आकार कंत्राटदाराने नमूद करणे-			
८	कंत्राटदारास अदा करावयाचे एकूण किमान वेतन व भत्ते			
९	सेवा कर (Service Tax) अ.क्र. ८ वर येणाऱ्या रकमेवर सेवा कराची आकारणी	१८%		
१०	कंत्राटाची एकूण किंमत सेवा कर धरून		F	
११	देय मासिक पारिश्रमिक खालीलप्रमाणे			
१२	मासिक पारीश्रामिकामधून वजा होणाऱ्या कायदेशीरर दायित्वाच्या बाबी			
i	(-) भविष्य निर्वाह निधी @१३% एकूण किमान वेतनावर	१३%		२,२४०
ii	(-) राज्य कामगार विमा योजना @ ०.७५%	०.७५%		१२९
iii	(-) व्यवसाय कर			२००
१३	कायदेशीर दायित्वाच्या एकूण वजाती		G	२,५६९
१४	कंत्राटी कर्मचाऱ्यास अदा करावयाची रक्कम		B-G	१७,१७९

दरपत्रकादाराची सही
रबर स्टँपसह

काळ्या यादीत न टाकल्याबाबत / बंदी न घातल्याबाबत प्रमाणपत्र

मी / आम्ही श्री. व श्री. मालक / संचालक (संस्थेचे नाव) शपथपूर्वक घोषित करतो की उक्त नमूद संस्था वर्षापासून मनुष्यबळ पुरवठ्याचे काम करत आहे. त्यानुसार मी/आम्ही असे स्वप्रमाणित करतो की, दरपत्रक / निविदा भरणेचे दिनांकास म्हणजेच दिनांक रोजी मनुष्यबळ पुरविण्याचे काम समाधानकाररित्या पार न पडल्यामुळे कोणत्याही केंद्र शासकीय, राज्य शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयाने मेसर्स (संस्थेचे नाव) या संस्थेस काळ्या यादीत टाकण्यात आलेले नाही अथवा संस्थेकडून मनुष्यबळ पुरवठ्याचे काम करून घेण्यास बंदी घालण्यात आलेली नाही. तसेच

या संस्थेविरुध्द मनुष्यबळ पुरवठ्याच्या कामाच्या अनुषंगाने भारतामधील कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा / खटला प्रलंबित नाही. तसेच आमचेविरुध्द कोणत्याही पोलीस स्थानकात गुन्हा दाखल नाही.

उपरोक्त प्रमाणे करण्यात आलेले निवेदन हे संपूर्णपणे सत्य आहे.

स्वाक्षरी

महाराष्ट्र शासन

धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय.

धर्मादाय आयुक्त भवन सास्मिरा इमारत, दुसरा मजला, सास्मिरा मार्ग, वरळी, मुंबई ४०००३० दूरध्वनी क्रमांक :24935434, 24935490 Website: www.charity.maharashtra.gov.in	Office of the CHARITY COMMISSIONER Sasmira Building, 2nd Floor,Sasmira Marg, Worli, Mumbai 400030. Tel No : 24935434, 24935490 E-mail ID: supdtest.mum-mh@gov.in

दरपत्रक **वाहनचालक** क्र. /२०२६ दि.

बाह्ययंत्रणमार्फत मनुष्यबळ (वाहनचालक) पुरविणाऱ्या संस्थाकडून दरपत्रक मागविणेबाबत

धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई (मुख्यालय) या कार्यालयात वाहनचालकाचे पद शासन मान्यतेच्या दिनांकापासून अकारा महिन्याच्या कालावधीसाठी बाह्ययंत्रणेमार्फत भरण्यासाठी वाहनचालक पुरविण्याऱ्या स्थानिक नोंदणीकृत संस्थांकडून दि.०१.०८.२०२६ ते दि.१५.०८.२०२६ या कालावधीत दरपत्रक मागविण्यात येत आहे.

दरपत्रक सादर करणेसाठी सविस्तर तपशिल, बाह्ययंत्रणद्वारे मनुष्यबळ पुरविण्याऱ्या संस्थाकरिता तसेच आवश्यक अटी, शर्ती इ. विषयक तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

अ	पक्षकार :-
	करारनाम्याचे पक्षकार हे कंत्राटदार आणि (ज्यांना काम सोपविले आहे) धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे राहतील.

ब	वाहनचालक उमेदवारांसाठी अटी व शर्ती
१	दिनांक २.०८.२०२६रोजी उमेदवाराचे वय किमान वय १८ वर्षे व कमाल ४५ असावे.
२	मोटार वाहन अधिनियम १९८८ (१९८८ चा ५९) मधील तरतूदीनुसार सक्षम अनुज्ञप्ती प्राधिकारी सबंधित उमेदवारास जारी केलेले हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन (एच. एम. व्ही./एल. एम. व्ही वाहन) चालविण्याचा परवाना/मूळ अनुज्ञप्तीपत्र (**Driving Licence**) आवश्यक
३	उमेदवार किमान माध्यमिक शालांत परीक्षा (१० वी) उत्तीर्ण असावा.
४	उमेदवारास शासकीय /निमशासकीय/खाजगी संस्थेमध्ये हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन (एच. एम. व्ही./एल. एम. व्ही वाहन) चालविण्याचा किमान ३ वर्षाचा

	अनुभव असल्याचे संस्थेचे प्रमाणपत्र आवश्यक (**खाजगी व्यक्तींकडे काम केल्याचे प्रमाणपत्र चालणार नाही.**)
५	उमेदवार वाहन चालविण्यासाठी मानसिक / शारिरीकदृष्टया पात्र असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र आवश्यक. उमेदवाराचा वाहन चालविण्याचा अभिलेख स्वच्छ असावा.
६	उमेदवारास मराठी, हिंदी भाषा वाचता व बोलता आणि इंग्रजी भाषा वाचता येणे आवश्यक आहे.
७	उमेदवार निर्व्यसनी असावा, गुन्हेगारी पार्श्वभूमीचा नसावा.
८	उमेदवारास वाहन दुरुस्तीची प्राथमिक माहिती असावी.
९	वाहनचालकाची वैयक्तिक माहिती पुरविणे आवश्यक राहील. उदा. शैक्षणिक अर्हता, कायम व सध्याचा पत्ता, नमुना स्वाक्षरी, अलीकडे काढलेला पासपोर्ट साईज फोटोग्राफ व बॅक खात्याचा तपशिल.

क	कंत्राटी वाहनचालकाची जबाबदारी
१	वाहनचालकाचा प्रत्येक दिवसाचा कामकाजाचा कालावधी ०९ तास ४५ मिनिटे राहील.
२	धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि धर्मादाय सह आयुक्त-१/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे ज्या वेळी कामावर बोलावतील त्यावेळेस तत्परतेने कामावर यावे लागेल.
३	वाहन स्वच्छ व सुस्थितीत ठेवणे ही कंत्राटी वाहनचालकाची जबाबदार असेल.
४	कंत्राटी वाहन चालकाचे कार्यक्षेत्र ह महाराष्ट्र राज्य संबंधित जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्र असेल, शासकीय कामानिमित्त आवश्यक भासल्यास जिल्हयाबाहेरील क्षेत्रात वाहन चालवावे लागेल.

ड	वाहन चालकाला अनुज्ञेय असणारे पारिश्रमिक, भत्ते व त्यांचे प्रदान
१	उक्त पदासाठी किमान वेतन अधिनियम १९४८ कायद्यानुसार वेतन देणे बंधनकारक राहील.
२	उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या सुधारीत अधिसूचना दि.२४.०७.२०१९ नुसार कंत्राटी किमान वेतनाचे दर सुधारित करण्यात आलेले आहेत. तसेच विविध कामगार कायद्यान्वये वेळोवेळी निश्चित कलेल्या दरानुसार विशेष/महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, इतर भत्ते व वजावटी उदा. भविष्य निर्वाह निधी/राज्य कामगार विमा योजना/व्यावसायिक कर/बोनस/कामगार कल्याण निधी या दायित्वांचा समावेश करुन कंत्राटी कमचाऱ्यांना किमान वेतन व अनुषंगिक भत्ते प्रदान करणे तसेच नियमातील तरतूदीनुसार त्याबाबतचे दायित्वे संबंधित प्राधिकरणाकडे भरणे बंधनकारक राहील.

३	वाहनचालकाचा प्रत्येक दिवसाचा कामाकाजाचा कालावधी ०९ तास ४५ मिनिटे राहील. या व्यतिरिक्त पुढे काम झाल्यानंतर शासन निर्णय वित्त विभाग, दि.०७.०८.२०२३ अन्वये किंवा शासनाने वेळोवेळी निर्धारित कलेल्या प्रचलित दारप्रमाणे अतिकालीक भत्ता लागू राहील.
४	कामाच्या दिवशी/रविवार/सुट्टीच्या दिवशील ०९ तास ४५ मिनिटापेक्षा (भोजन वेळ धरुन) आणि रविवार व सुट्टीच्या दिवशील सुध्दा काम केल्यास दर तासाला रु.१००/- भत्याचा दर असून, अर्धा तास व त्यापुढील कामासाठी तो पूर्ण तास गणण्यात येईल. वाहनचालकास एका महिन्यात मिळणाऱ्या अतिकालिक भत्याची रक्कम त्याच्या पगाराच्या ३०% पेक्षा जास्त असणार नाही.

इ	दरपत्रकासंबंधीच्या अटी व शर्ती :-
	अ. तांत्रिक लिफाफा
१	संबंधित संस्था/अर्जदार ही खालीलपैकी एका कायद्यांतर्गत असावी. (नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडावी) • मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ • भागीदारी संस्था अधिनियम, १९३२ • सहकारी संस्था अधिनियम, १९६१ • कंपनी अधिनियम, १९५६
२.	उदयोग, उर्जा व कामगार विभाग. शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग III उदयोग -४, दिनांक ०१.१२.२०१६ मधील प्रकरण क्र./अ.क्र. ३.१ व प्रकरण क्र.६/परिशिष्ट ८ मधील तरतुदीनुसार निविदा/दरपत्रक अर्जासोबत निविदा शुल्क रु.१००/व बयाना रक्कम रु.१०००/ धनाकर्ष (राष्ट्रीयकृत बँकेचा) धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे नावाने देण्यात यावा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना प्राप्त निविदा शुल्क /बयाना रक्कम योग्य लेखाशीर्षाखाली जमा करावे. फक्त रोजगार व स्वयंरोजगार विभाग, शासन निर्णय क्र. रोस्वरो २००२/प्र.क्र.२६७/रास्वरो-१, दिनांक १७.०८.२००२ मधील अ. क्र. ८ अनव्ये शासकीय किंवा निमशासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयांमध्ये सेवेचा पुरवठाकरीता निविदा/दरपत्रक भरताना निविदा शुल्क/बयाणा रक्कम भरण्याच्या अटीतून पंजीकृत बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थांना/लोकसेवा केंद्राना सुट देण्यात आली आहे. त्याअनुषंगे आवश्यक प्रमाणपत्र सोबत जोडण्यात यावे. याव्यतिरिक्त अन्य शासन निर्णयातील तरतुदीनुसार अनामत रक्कम भरण्यापासून सूट मिळण्याची अट या दरपत्रिकेस लागू होत नसल्याने त्याअंतर्गत मोडणाऱ्या संस्थाना अनामत रक्कम भरणे अनिवार्य असेल.

३	आयकर अधिनियमाप्रमाणे दरमहा अदा होणाऱ्या देयकामधून नियमानुसासर आयकर वजा करण्यात येईल. यासाठी पॅनकार्डची छायांकित प्रत जोडण्यात यावी.
४	वस्तू व सेवा कर कायदा, २०१७ नुसार नोंदणीकृत असल्याचे प्रमाणपत्र व क्रमांक जोडण्यात यावे.
५	वाहनचालकाच्या वेतनातून भविष्य निर्वाह निधी/राज्य कामगार विमा योजना (EPF/ESIC) अंतर्गत वर्गणी वजा करण्यात येत असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.
६	मागील-२ वर्षाच्या कालावधीत किमान २ शासकीय/निमशासकीय कार्यालयांना कंत्राटीतत्वावर वाहनचालक पुरविल्याबाबत व त्यांचे काम समाधानकारक असल्याचे संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे.
७	संस्थेची वार्षिक उलाढल ही मागील दोन वर्षासाठी सरासरी दहा लाखांपेक्षा कमी नसावी. तसेच सनदी लेखापालांकडून प्रमाणित करण्यात आलेल्या मागील दोन वर्षाच्या ताळेबंदाच्या प्रती दरपत्रक अर्जासोबत जोडण्यात याव्यात.
८	संस्थेचे नांव काळया यादीत समाविष्ट नसल्याबाबतचे, संस्थेविरोधात पोलिस चौकशी/तपास/न्यायालयीन प्रकरणे चालू नसल्याचे हमीपत्र संस्थेच्या चालकांचे सहीनिशी जोडण्यांत यावे.

ब	व्यापारी लिफाफा
१	कंत्राटी वाहनचालकासाठी किमान वेतन अधिनियम १९४८ कायद्यानुसार वेतन देणे बंधनकारक राहील.
२	उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या सुधारित अधिसूचना दिनांक २४.०७.२०१९ नुसार व किमान वेतन अधिनियमातील तरतूदीनुसार द्यावयाच्या मासिक पारिश्रमिक रक्कम दिलेल्या विहित नमुन्यात सादर करावी.
३.	कंत्राटदाराने / पुरवठादाराने / निविदाकाराने वरील किमान वेतनानुसार मासिक पारिश्रमिक दर अदा करावे.
४.	कंत्राटदार / पुरवठादाराचे मान्य दर हे कार्यारंभ आदेश दिल्याच्या तारखेपासून ११ महिन्यांसाठी लागू राहतील. दर कराराच्या कालावधीत कोणतीही दरवाढ मंजूर केली जाणार नाही.

ई.	दरपत्रके छाननीबाबत

१.	कंत्राटदाराने / पुरवठादाराने नमूद केलेले दर हे दरपत्रके उघडण्याच्या तारखेपासून ९० दिवसांच्या कालावधीपर्यंत वैध / विधीग्राह्य असतील.
२.	दरपत्रके शक्य झाल्यास विहित केलेल्या दिनांकास उघडण्यात येतील. तांत्रिक दरपत्रकामध्ये पात्र ठरलेल्या पुरवठादाराचेच लिफाफे उघडण्यात येतील
३.	तांत्रिक दरपत्रक उघडल्यानंतर दरासंबंधीचे लिफाफे उघडण्यास काही अडचणी आल्यास दरपत्रकाचा लिफाफा उघडला जाणार नाही. किमान ३ वैध दरपत्रके असतील तरच दराचा लिफाफा उघडण्यात येईल. त्यातून पात्र ठरलेल्या कंत्राटदाराचे / पुरवठादाराचे न्युनतम किमतीचे दर स्विकृत करण्यात येतील.
४.	प्राप्त झालेले दर हे बाजारातील प्रचलित दरापेक्षा अवास्तव वा जास्त असणार नाहीत.
५.	शासनाने ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीनुसार दरपत्रके छाननीबाबतचा अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार कंत्राट मूल्याप्रमाणे) धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे राखून ठेवण्यात येतील. सदर निर्णय कंत्राटदार / पुरवठादार यांना मान्य करणे बंधनकारक राहील.

फ.	पात्र निविदाकाराने / पुरवठादाराने करावयाच्या कार्यवाहीबाबत :
१.	उद्योग, ऊर्जा व कागार विभाग, शासन निर्णय क्र. : भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग- iii/उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६ मधील प्रकरण क्र. ४/अ.क्र.४.६ मधील तरतुदीनुसार दरपत्रके मान्य झालेल्या कंत्राटदारास / पुरवठादारास निकाल कळविल्यानंतर १५ दिवसांच्या आत सुरक्षा ठेव अनामत (Performance Security Deposit) रुपये १०,०००/ राष्ट्रीयककृत बँकेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे नावे द्यावा लागेल. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी प्राप्त सुरक्षा ठेव रकक्म योग्य लेखाशीर्षाखाली जमा करावे.

२.	पात्र कंत्राटदाराने / सेवा पुरवठादाराने कामाचे आदेश देण्यापूर्वी रुपये ५००/- चे मुद्रांक पेपर वर करारनामा करून देणे आवश्यक राहील.
३.	करारनामा केल्यानंतर कंत्राटदाराने दिलेल्या विहित मुदतीत आवश्यकतेप्रमाणे मनुष्यबळ पुरवठा न केल्यास विहित नियमानुसार विलंब आकार / दंड आकारला जाईल. सदर दंडाची वसुली प्रशासकीय सेवा आकार किंवा सुरक्षा ठेव अनामत रकमेतून करण्यात येईल.
४.	कंत्राटदाराकडून / पुरवठादाराकडून करारनाम्यातील कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास कामाचे आदेश रद्द करण्यात येतील व त्याला कोणतीही रक्कम प्रदेय राहणार नाही. जमा केलेल्या

	सुरक्षा ठेव अनामत रक्कम जप्त केली जाईल.
५.	करारनाम्याच्या कालावधीत कोणतीही तक्रार प्राप्त न झाल्यास, करारनाम्याच्या कालावधी पुर्ण झाल्यानंतर अथवा करारनामा संपुष्टात आल्यानंतर सदर रक्कम मुक्त करण्यात येईल.
६.	धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता निविदाधारकास १ महिन्याची आगाऊ नोटीस देऊन करारनामा रद्द करण्याचा / संपुष्टात आण्ण्याचा अधिकार असेल.

	मासिक पारिश्रमिक अदा करण्याबाबतची कार्यपध्दती :
१.	वरीलप्रमाणे मनुष्यबळ पुरवठा केल्यानंतर . धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडून रुजू झाल्याबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई, मुंबई यांचेकडून संबंधित उमेदवाराची उपस्थितीची हजेरीपटावर नोंद घेतील.
२.	धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी प्रत्येक महिन्याच्या कार्यालयीन कामकाजाच्या शेवटच्या दिवशी संबंधित उमेदवाराचे उपस्थिती प्रमाणपत्र कंत्राटदार / पुरवठादार यांचेकडे पाठविणे आवश्यक राहील.
३.	कंत्राटदाराने / पुरवठादाराने उपस्थिती प्रमाणपत्राच्या प्रतीसह महिन्याच्या ०५ तारखेपर्यंत देयक सादर करावे. देयक पारित झाल्यानंतर संबंधित कंत्राटदार / पुरवठादार यांना ई-प्रदान (NEFT/ECS/RTGS) करण्यात येईल. बाह्ययंत्रणेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सफाईगारास मासिक पारिश्रमिक त्यांच्या बँक खात्यामध्ये अदा केल्याचा पुरावा संबंधित संस्थेस धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांना प्रत्येक महिन्यात सादर करावा लागेल, त्यानंतरच पुढील महिन्याचे वेतन संस्थेस अदा करण्यात येईल.
४.	कंत्राटदारास देयक सादर करण्यास विलंब झाला तरी देखील मासिक पारिश्रमिक कंत्राटदाराने / पुरवठादाराने प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत संबंधित उमेदवाराच्या बँक खात्यावर रेखांकित धनादेशाव्दारे (Account Payee Cross Cheque)/ NEFT/ECS/RTGS जमा करणे आवश्यक राहील.
५.	कंत्राटदाराने / पुरवठादाराने कंत्राटी वाहन चालकाला दिलेल्या पारिश्रमिकाच्या / इतर भत्त्यांच्या प्रदानाबाबतची छायांकीत प्रत दर महा सादर केल्याशिवाय कंत्राटदाराला / पुरवठादाराला पुढील महिन्याचे देयक अदा केले जाणार नाही.
६.	कंत्राटदाराने / पुरवठादाराने कंत्राटी वाहनचालकाला मासिक वेतनचिठ्ठी देणे आवश्यक राहील.

	महिन्याचे देयक अदा केले जाणार नाही.
६.	कंत्राटदाराने / पुरवठादाराने कंत्राटी वाहनचालकाला मासिक वेतनचिठ्ठी देणे आवश्यक राहील.
७.	कंत्राटदाराने / पुरवठादाराने कंत्राटी वाहनचालकांना किमान वेतन कायद्यातील तरतूदीपेक्षा कमी वेतन दिल्यास अथवा दायित्वाची रक्कम ठरलेल्या दराप्रमाणे कपात करून संबंधित प्राधिकरणाकडे जमा न केल्यास अथवा संबंधित उमेदवाराकडून ज्यादा रक्कम घेतल्याबाबतची तक्रार प्राप्त झाल्यास व तसे पुरावे आढळल्यास संबंधित कंत्राटदार / पुरवठादार किमान वेतन कायद्यातील तरतूदीप्रमाणे कारवाईस पात्र असेल.
८.	कंत्राटदारास / पुरवठादारास रक्कम अदा करताना आयकर व वस्तु व सेवाकर (GST) कायद्यातील तरतूदीनुसार आयकारीची/वस्तु व सेवाकरची रक्कम कपात करुन उर्वरित रक्कम अदा केली जाईल. वस्तु व सेवा कर (GST) २०१७ व महाराष्ट्र वस्तू व सेवा कर कायद्याअंतर्गत अधिसूचना क्र. ५०/२०१८ मधील तरतूदीनुसार वस्तू व सेवा विषयक एका संविदाखालील मूल्य रु. २,५०,०००/- पेक्षा अधिक असेल अशा करपात्र वस्तू किंवा सेवा यांच्या पुरवठ्यासाठी प्रदान करण्यात येणाऱ्या रकमेतून विहित दरानुसार कपात करण्याची **धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई** यांना बंधनकारक राहील. तसेच याबाबत शासनाकडून वेळोवेळी लागू करण्यात आलेल्या नियमांप्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक राहील.
९.	व्यवसाय कर भरण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदार / पुरवठादार यांचे राहील.
१०.	उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१९/प्र.क्र.१३/ कामगार-८, दि. २२.०२.२०१९ नुसार कंत्राटी कर्मचाऱ्यास अदा करण्यासंबंधीच्या "जोडपत्र अ" मधील तरतूदी कंत्राटदारास / पुरवठादारास / निविदाकारास बंधनकारक राहील.
११.	**धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,** यांचेमार्फत कंत्राटदारास मासिकि पारिश्रमिकाची अदायगी होणार असल्यामुळे दायित्व नियमातील तरतूदीनुसार जमा केले जात असल्याबाबतची खातरजमा त्यांचे स्तरावरून करणे आवश्यक राहील. करारनामा समाप्त झाल्यानंतर कंत्राटदारास सुरक्षा ठेव अनामत अदा करण्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र **धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई** यांचेकडे सादर केल्यानंतर अनामत रक्कम अदा करण्याबाबतचे आदेश **धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,** निर्गमित करण्यात येततील.

	बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ (वाहनचालक) पुरविणाऱ्या संस्थांसाठी अटी व शर्ती
१.	वाहनचालक उमेदवाराची कंत्राटी सेवा चालू ठेवण्याचे संपुष्टात / आणण्याचे सर्व अधिकार

	धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य , मुंबई यांचे स्वाधीन राहतील.
२.	वाहनचालकाच्या निष्काळजीपणामुळे वाहनाचे काही नुकसान झाल्यास संस्थेस त्याच्या दुरुस्तीचा खर्च करावा लागेल. तसेच दुर्देवाने वाहनचालकास गंभीर स्वरुपात इजा झाल्यास त्याच्या वैद्यकीय खर्चाचे अथवा नुकसान भरपाईचे कोणतेही उत्तरदायित्व हे संचालनालयाकडे राहणार नाही. त्याची पूर्णतः जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.
३.	वाहनचालकाच्या वेळेवर कार्यालयात उपस्थित न झाल्यास किंवा विनापरवानगी गैरहजर राहिल्यास त्याचे त्या दिवसाचे वेतन अदा करण्यात येणार नाही.
४.	वाहनचालक रजेवर असल्यास पर्यायी वाहनचालक पुरविणे बंधनकारक राहील.
५.	वाहनचालक उमेदवारास भौगोलिक (मुंबई शहर/उपनगर व बाहेरील जवळपासच्या जिल्ह्यांचे) ज्ञान असणे आवश्यक आहे.
६.	उमेदवाराच्या सचोटी / चारित्र्याबाबतचे पोलीस खात्याचे प्रमाणपत्र हजर झाल्यावर सादर करावे लागेल.
७.	कायम स्वरूपी शासकीय नोकरीसाठी कार्यालयाकडे/शासनाकडे न्यायालयाकडे/ दावा अथवा खटला करणार नाही, अशा आशयाचे हमीपत्र सेवेत हजर होताना सादर करणे बंधनकारक.
८.	कोणतीही दरपत्रक स्विकारण्याचा किंवा एखादी/सर्वच दरपत्रक प्रक्रिया कारण न देता रद्द करण्याचा किंवा त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई याना राहिल.

वर नमूद अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या संस्थाकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

दि.३०.०७.२०२६ सांयकाळी ०५.०० वाजेपर्यंत या कार्यालयात स्वतः सादर करावीत किंवा वेळेत कार्यालयात मिळतील या प्रमाणे पोस्ट/कुरियर सेवेद्वारे पाठवातीत. दि.३०.०७.२०२६ दिनाका नंतर प्राप्त होणारी दरपत्रके दर प्रक्रियेसाठी विचारात घेतली जाणार नाही.

दि.३०.०७.२०२६ पर्यंत मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई (http://charity.maharashtra.gov.in.) या संकेतस्थळावर Tenders and Quotation या दुव्याखाली (tab) उपलब्ध राहिल.

23/07/26

ठिकाण : मुंबई
दिनाक 23.07.2026

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

तांत्रिक लिफाफा

१.	कंत्राटदाराचे संस्थेचे/कंपनीचे नाव व पूर्ण पत्ता	
	मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण परिक्षेत्रातील कार्यालयाचा तपशिलवार पत्ता	
२.	संस्था/कंपनी/फर्म असल्यास	
	नोंदणीचा तपशिल	
	अ) कंत्राटदाराचा/संस्थेचा/कंपनीचा संपूर्ण पत्ता	
३.	संपर्काचा तपशील	
	अ) दूरध्वनी क्रमांक	
	ब) भ्रमणध्वनी	
	क) ईमेल आयडी	
४.	दुकान परवाना क्रमांक/प्रमाणपत्र (नुतनीकरणासह)	
५.	EPF रजिस्ट्रेशन क्रमांक	
६.	ESIC रजिस्ट्रेशन क्रमांक	
७.	वस्तु व सेवा कर नोंदणी क्रमांक	
८.	व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र	
९.	शासकीय / निमशासकीय कार्यालयात कंत्राटी तत्वावर वाहनचालकाचा पुरवठा केला असल्याबाबत संबंधित विभागाने निर्गमित केलेले कोणतेही प्रमाणपत्र	
१०.	संस्थेचे/कंपनीचे/मालकाचे आयकर Pan Card क्रमांक (प्रत)	
११.	मागील ३ वर्षाचे Income Tax Return	
१२.	सनदी लेखापालाकडून प्रमाणित करण्यात आलेल्या मागील दोन वर्षाच्या ताळेबंदाच्या प्रती	
१३.	काळ्या यादीत न टाकल्याबाबत/बंदी न घातल्याबाबत प्रमाणपत्र	
१४.	अनुभव प्रमाणपत्र	

१. दरपत्रक मंजूर करण्याचे सर्व अधिकार खरेदी समितीकडे राखीव आहेत हे मला मान्य आहे.
२. या दरपत्रकातील अटी व शर्ती मला संपूर्णपणे मान्य आहेत. तसेच अटी व शर्तीबाबत माझी कोणतीही तक्रार नाही.
३. दरपत्रकासमवेतच्या करारनाम्यातील सर्व बाबी मला विनाशर्त मान्य आहेत.
४. प्रमाणपत्रे सोबत जोडली आहेत.

दरपत्रकादाराची सही
रबर स्टँपसह

व्यापारी लिफाफा

अ.क्र.	बाब			कुशल कामगारासाठी दर (प्रतिमाह) रुपया मध्ये
१	मूळ वेतन Basic Pay			१६,६२०
२	विशेष भत्ता (Special Allowance)			३,१३५
३	एकूण किमान वेतन		A	१९,७५५
i	(+) घरभाडे भत्ता @ ५% एकूण किमान वेतनावर	५%		९८८
ii	(+) बोनस उपदान @ ८.३३% एकूण किमान वेतनावर	८.३३%		१,६४६
iii	(+) रजा उपदान @ १.२८% एकूण किमान वेतनावर	१.२८%		२५३
४	एकूण किमान वेतन व भत्ते		B	२२,६४२
५	कर्मचाऱ्याच्या किमान वेतनातून वजा करावयाच्या कायदेशीर दायित्वाच्या बाबी			
i	भविष्य निर्वाह निधी @ १२% एकूण किमान वेतनावर	१२%		२,३७१
ii	प्रशासकीय दर भ.नि.नि. करीता @ १.१५% एकूण किमान वेतनावर	१.१५%		२२७
iii	राज्य कामगार विमा योजना @ ३.२५% एकूण किमान वेतन व भत्तेवर	३.२५%		७३६
iv	कामगार कल्याण निधी			००६
v	कायदेशीर दायित्वाच्या एकूण वजाती		C	३,३४०
६	एकूण किमान वेतन व भत्ते		D(B+C)	२५,९८२
७	सेवा आकार कंत्राटदाराने नमूद करणे-		E	

८	कंत्राटदारास अदा करावयाचे एकूण किमान वेतन व भत्ते		F(D+E)	
९	सेवा कर (Service Tax) अ.क्र. ८ वर येणाऱ्या रकमेवर सेवा कराची आकारणी		G	
१०	कंत्राटाची एकूण किंमत सेवा कर धरून		H(F+G)	
११	देय मासिक पारिश्रमिक खालीलप्रमाणे			
१२	मासिक पारीश्रामिकामधून वजा होणाऱ्या कायदेशीरर दायित्वाच्या बाबी			
i	(-) भविष्य निर्वाह निधी @१३% एकूण किमान वेतनावर	१३%		२,५६८
ii	(-) राज्य कामगार विमा योजना @ ०.७५%	०.७५%		१४८
iii	(-) व्यवसाय कर			२००
१३	कायदेशीर दायित्वाच्या एकूण वजाती		I	२,९१६
१४	कंत्राटी कर्मचाऱ्यास अदा करावयाची रक्कम		J(I+B)	१९,७२६

दरपत्रकादाराची सही

रबर स्टँपसह

काळ्या यादीत न टाकल्याबाबत / बंदी न घातल्याबाबत प्रमाणपत्र

मी / आम्ही श्री.

व श्री. मालक / संचालक (संस्थेचे नाव) शपथपूर्वक घोषित करतो की उक्त नमूद संस्था वर्षापासून मनुष्यबळ पुरवठ्याचे काम करत आहे. त्यानुसार मी/आम्ही असे स्वप्रमाणित करतो की, दरपत्रक / निविदा भरणेचे दिनांकास म्हणजेच दिनांक

रोजी मनुष्यबळ पुरविण्याचे काम समाधानकाररित्या पार न पडल्यामुळे कोणत्याही केंद्र शासकीय, राज्य शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयाने मेसर्स (संस्थेचे नाव) या संस्थेस काळ्या यादीत टाकण्यात आलेले नाही अथवा संस्थेकडून मनुष्यबळ पुरवठ्याचे काम करून घेण्यास बंदी घालण्यात आलेली नाही. तसेच

या संस्थेविरुध्द मनुष्यबळ पुरवठ्याच्या कामाच्या अनुषंगाने भारतामधील कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा / खटला प्रलंबित नाही. तसेच आमचेविरुध्द कोणत्याही पोलीस स्थानकात गुन्हा दाखल नाही.

उपरोक्त प्रमाणे करण्यात आलेले निवेदन हे संपूर्णपणे सत्य आहे.

स्वाक्षरी